रजि. नं. अे-१६

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे


कार्यालय : 'क्षत्रिय भवन', ५७६, गुरुवार पेठ, पुणे-४११०४२. फोन. : ०२० -२४४७२३४०,२४४३५६९५
उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे-४११०४२.
(कार्यालयीन वेळ : सकाळी १० ते १, सायं. ४ ते ७)

Web : www.ssksamajpune.com
E-Mail : ssksamajtrustpune@gmail.com




# विशेष सर्वसाधारण सभा

## १ फेब्रुवारी २०१५

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

## विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी पदाधिकारी

| | |
|---|---|
| अध्यक्ष - | श्री मनोज गुरुनाथसा आरसिध्द् |
| उपाध्यक्ष - | श्री यल्लेश अशोकसा रंगापूरे |
| सचिव - | श्री अनिल नारायणसा दामजी |
| उपसचिव - | श्री योगेश चंद्रकांतसा काटवे |
| खजिनदार - | श्री राजेश चंद्रकांतसा कुक्कर |
| हिशोबतपासणीस - | श्री अशोक बाळासाहेबसा कटारे |
| सदस्य - | श्री राजेंद्र गुरुनाथसा भांडगे |
| | श्री प्रदिप विठ्ठलसा काटवे |
| | श्री संतोष माणिकसा बाकळे |
| | श्री नितिन बाळकृष्णसा धोंगडी |
| | श्री उमेश हिरालालसा आरसिध्द् |
| | सौ. लिना नितिन मामर्डे |
| | सौ. आशा संतोष चव्हाण |
| | सौ. सुवर्णा राजेंद्र झाड |
| | सौ. अलका राजेश भांडगे |
| समन्वय समिती | श्री हेमंत चंद्रकांतसा खेरुड |
| | श्री राजाभाऊ दत्तात्र्यसा वाळवेकर |
| | श्री कमलाकरसा चंद्रकांतसा पटवेकर |
| | श्री रत्नाकरसा हिरालालसा झाड |
| | श्री शशिकांतसा रामकृष्णसा मैत्राणी |

**टिप : कार्यकारिणीच्या वेळोवेळी झालेल्या सभेला अनुपस्थित राहिल्यामुळे घटनेप्रमाणे कार्यकरिणीमध्ये वेळोवेळी झालेले बदल -**
श्री संजय रामकृष्णसा चव्हाण यांच्या जागी श्री राजेंद्र पवार यांना घेतले होते.
श्री राजेंद्र पवार यांच्या जागी श्री नितिन बाळकृष्णसा धौंगडी, श्री अनिल विष्णूसा पवार यांच्या जागी श्री उमेश हिरालालसा आरसिध्द् यांना घेतले आहे.

कार्यकारिणीच्या वेळोवेळी झालेल्या

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

कार्यालय : 'क्षत्रिय भवन', ५७६, गुरुवार पेठ, पुणे-४११०४२.
रजि. नं. : मुंबई/३०२/आर.एन.नं. ए-१६ पुणे
उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे-४११०४२.
(कार्यालयीन वेळ : सकाळी १० ते १, सायं. ४ ते ७)

## विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस -

(फक्त सभासदांसाठी)

माननीय समाज बंधु-भगिनींनो,

आपल्या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १ फेब्रुवारी २०१५ रोजी स्वारगेट येथील आपल्या समाजाच्या पटांगणात सायंकाळी ठिक ४.०० ते ८.०० या वेळेत होणार आहे. तरी सर्व समाज बांधव सभासद बंधु-भगिनींनी या विशेष सर्वसाधारण सभेला वेळेवर उपस्थित राहावे व सभेच्या कामकाजामध्ये सहभाग घ्यावा ही नम्र विनंती. सभा झाल्यानंतर आल्पोपहारची सोय करण्यात आली आहे.

**सभेपुढील विषय :-**

१) समाजाचे सार्वजनिक विश्‍वस्त व्यवस्थेचे नोंदणी क्रमांक रजि. नंबर अे/१६ पुणे मध्ये आपल्या संस्थेचे नाव 'श्री समस्त सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय कम्युनिटी मठ' असे नमुद केलेले आहे. मात्र आपल्या समाजाचे संपूर्ण कामकाज ''श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट पुणे'' या नावाने केले जात आहे. या दोन नावातील विसंगतीमुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. तरी धर्मदाय उपआयुक्त साहेबांकडे आपल्या रजि. नंबर अे/१६ पुणे मध्ये विश्‍वस्थेचे नाव ''श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे'' असे दुरुस्त करण्यात यावे असा ठराव संमत करणे.

२) समाजाची दिनांक ९ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सुधारीत घटना व नियमबाबत सदर सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन त्यामध्ये योग्य दुरुस्ती करून ती मंजुर करण्यात आली आहे. सदर मंजूर घटना व नियम प्रत मा. धर्मदाय उपआयुक्त साहेबांकडे आताच्या कार्यकारिणीमार्फत दाखल करण्यात यावा असा ठराव संमत करणे.

३) धर्मदाय आयुक्तांकडे समाजाचे प्रलंबित सर्व दाव्यातील अर्जदार, प्रतिवादी, हरकतदार यांना सर्व कोर्ट प्रकरणामध्ये यापुढे कोणताही नवीन पुरावा वा म्हणणे दाखल करावयाचे नसून सदर प्रकरण निकाली काढण्यात यावे म्हणुन अर्ज देण्यासाठी आवाहन करणे.

४) श्री. अनिल विष्णूसा पवार व इतर ६ यांनी दाखल केलेली घटना अर्ज क्र. ३२/०५ बाबत चर्चा व निर्णय.

५) धर्मदाय आयुक्तांकडे समाजाचे प्रलंबित दावे निकाली काढण्यात यावेत म्हणून समाजातर्फे विनंती अर्ज करणे.

६) श्री गजानन अर्जुनसा शालगर यांच्या कार्यकारिणीने १२ मे २००८ रोजी २००६ ते २००८ त्रैवार्षिक छापील अहवाल दिलेला आहे. १२ मे २००८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये २००६ व २००७ या दोन वर्षांचा ऑडिटेड बॅलन्सशिट मंजुर करण्यात आला होता. त्यावेळी २००८ सालाचा ऑडिटेड बॅलन्सशिट मंजूर करण्याचा विषय प्रलंबित ठेवण्यात आला होता. तो ताळेबंद व हिशेब संमत करणे.

७) श्री. गजानन अर्जुनसा शालगर यांच्या कार्यकारिणीने १.४.२००८ ते ३१.८.२००८ मुदतीचा हिशोब दिला आहे तो स्विकृत करणे.

८) श्री. अनिल नारायणसा वाळवेकर व श्री. संजय गुरुनाथसा भांडगे यांच्या कार्यकारिणीने १९.२.२०११ रोजी १ सप्टेंबर २००८ ते ३१ मार्च २०१० या दिडवर्षाचा जमा खर्च हिशेबा दाखल केला होता. त्यावेळी वरील विषय ७ मधील हिशोब दाखल झाला नसल्यामुळे ऑडीटेड बॅलन्सशिटस तयार करता आले नाहीत. आता दोन्ही हिशोब एकत्र करून ऑडीटेड बॅलन्सशीटस तयार करून घेण्याबाबत.

९) श्री. अनिल नारायणसा वाळवेकर व श्री. संजय गुरुनाथ भांडगे यांच्या कार्यकारिणीकडुन १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०१३ या तीन वर्षाचा ऑडीटेड बॅलन्सशिटस् येणे बाकी. तसेच १ एप्रिल २०१३ ते ३१ मे २०१४ पर्यंतचा ऑडिटेड बॅलन्सशिटस् येणे बाकी त्याबाबत चर्चा व निर्णय.

१०) श्री. अनिल नारायणसा वाळवेकर व श्री. संजय भांडगे यांच्या कार्यकारिणीकडून संस्थेचे रेकॉर्ड, सभेचे मिनट बुक, सी.डी. हिशोबाच्या वह्या, बँक खात्याचे स्टेटमेंट, ऑडीटरचे रिपोर्ट, तसेच आशा पब्लिसिटी यांच्याकडील हिशोब इत्यादी येणे बाकी आहे. अशा पब्लिसिटी यांनी बोर्डाचे भाडे देताना टि.डी.एस. वजा करून भाडे दिले आहे. इन्कमटॅक्सचे रिटर्न वेळेवर न भरल्यामुळे सदर टि.डी.एस. ची

रक्कम समाजाला परत मिळाली नाही त्या झालेल्या नुकसानीबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

११) कॅनरा बँक, विश्वेश्वर बँक येथील काही फिक्स डिपॉझिटची मुदत २००८ साली संपली आहे. त्याचे नुतनीकरण न केल्यामुळे संस्थेचे आर्थिक खुपच नुकसान झाले आहे. त्या पावत्याचे नुतनीकरण श्री. मनोज आरसिद्ध यांच्या कार्यकारिणीने मागील तारखेपासुन शक्यतो जास्तीत जास्त व्याज दराने करून घ्यावे. त्याबाबत चर्चा व निर्णय घेणे.

१२) श्री. मनोज गुरुनाथसा आरासिद्ध यांच्या कार्यकारिणीचा १ जुन २०१४ ते ३१ डिसेंबर २०१४ कार्यकाळाचा अहवाल व हिशोब.

१३) ९ डिसेंबर २०१३ रोजी मंजुर झालेल्या घटनेप्रमाणे पुणे जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांची जनगणना करणे व आजीवन सभासद नोंदणी करणे.

१४) समाजाच्या दोन्ही मिळकतीचा पुणे म.न.पा. मिळकत कर थकबाकी भरण्याबाबत चर्चा व निर्णय.

१५) स्वारगेट व क्षत्रिय भवन येथील जागेमध्ये योग्य दुरुस्ती वा बदल करून ते कार्यासाठी वापरण्यायोग्य करणे व भाडेवाढ करण्याबाबत चर्चा व निर्णय.

१६) स्वारगेट येथील भु भाडेकरूंसोबत केलेले भाडे करार व त्यांना दिलेल्या सवलती यासंदर्भात माहिती घेणे.

१७) स्वारगेट येथील मोकळ्या जागेत शेड उभारून जास्तीत जास्त जागेचा वापर समाजबांधवासाठी कसा करता येईल याचा विचार करणे.

१८) समाजातील कौटुंबिक तंटे / वाद सामोपचाराने मिटविण्यासाठी समाजातील वकील व जेष्ठ व्यक्तिंची पंच म्हणून नेमणुक करण्याबाबत.

१९) स्वारगेट येथील नविन जाहिरात फलकांचे करार करणे बाबत.

२०) अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस येणारे आयत्या वेळेचे विषय.

पुणे
दिनांक : १५.२.२०१५

**श्री. अनिल नारायणसा दामजी**
सचिव

## सभासदांना सूचना

१) गणसंख्येअभावी सभा न घेता आल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल व या सभेस गणसंख्यापूर्तीचे बंधन राहणार नाही.

२) अहवालातील वृत्तासंबंधी व ताळेबंद जमाखर्चाबद्दल कोणा सभासदास काही कागदपत्रे पहावयाची असतील त्यांनी दिनांक २४.१.२०१५ ते २८.१.२०१५ पर्यंत सायं.४ ते ७ या वेळात लेखी अर्जासह संस्थेच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

३) सभेस येताना अहवालाची आपली प्रत सोबत आणावी.

४) घटनेप्रमाणे सभास्थळी प्रत्येक सभासदाने आपले नांव लिहून सही करणे आवश्यक आहे.

५) विशेष सर्वसाधारण सभेत कोणा सभासदास काही सूचना अगर ठराव मांडावयाचा असल्यास तशा सूचनेसह अगर ठरावासह लेखी अर्ज संस्थेच्या मुख्य कार्यालयात दिनांक २८.१.२०१५ पर्यंत सायं. ४ ते ७ या वेळेत आणून देऊन त्या प्रतीवर पोहोच घेणे आवश्यक आहे. फक्त संस्थेच्या कार्यासंबंधीच्या सूचनांचा / ठरावांचा यात विचार केला जाईल. कार्यकारिणीच्या परवानगीने ही सूचना / ठराव विशेष सर्वसाधारण सभेत मांडली जाईल. कोणत्याही वैयक्तिक तक्रारींचा वा ठरावांचा यात विचार केला जाणार नाही.

६) फक्त संस्थेच्या सभासदांनाच या सभेत भाग घेता येईल. प्रत्येक इच्छुक सभासदास आपले विचार मांडता येतील याची कृपया नोंद घ्यावी.

७) कृपया या सभेस लहान मुलांना आणू नये. त्याने सभेच्या कार्यात अडथळे येतात.

८) समाजहिताशी संबंधित असेच प्रश्न मांडून त्यावर आटोपशीर चर्चा करावी. विषय अथवा विचारांची पुनरावृत्ती टाळून आम्हाला सहकार्य करावे, जेणेकरून सभेचा वेळ वाया न जाता जास्तीत जास्त सभासदांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळेल.

**टीप :** समाजबांधवांना विशेष सर्व साधारण सभेचा अहवाल पोस्टाने पाठविण्यात येईल वा समक्ष देण्यात येईल. ज्यांना अहवाल मिळणार नाहीत त्यांना दिनांक २५.१.२०१५ नंतर कार्यालयात अहवाल उपलब्ध होतील.

## विशेष सर्वसाधारण सभेपुढील विषय व ठराव

**विषय क्र. १** : आपल्या समाजाची ''श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज'' या नावाची अनरजिस्टर्ड संस्था १९२७ पासून कार्य करीत आहे. दि. २१.१.१९५२ रोजी मुंबई सार्वजनिक ट्रस्ट कायदा सन १९५० च्या अन्वये सदर ट्रस्ट ''श्री समस्त सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाजाचा मठ'' या नावाने विश्वस्त कायद्याखाली नोंदविणे आवश्यक असल्यामुळे नोंदला गेला आहे. उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरून दिसून येते की २९ एप्रिल १९५५ रोजी धर्मदाय आयुक्तांकडे समाजाची जी घटना व नियम दाखल केले त्यामध्ये व सन १९५८-५९ साली सुद्धा जी घटना व नियम प्रत धर्मदाय आयुक्तांकडे दाखल केले त्यामध्ये कलम २ मध्ये ''सदर संस्थेचे नाव 'श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज पुणे' असे राहील. यापुढे 'श्री समस्त सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाजाचा मठ' हा 'श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे' या नावाने ओळखला जाईल व तशी दुरुस्ती चॅरिटी कमिशनरकडे कळविण्यात येईल.'' असा स्पष्ट उल्लेख आहे. त्याप्रमाणे १९६१ साली धर्मदाय आयुक्तांच्या नोंदणी पुस्तकामध्ये नोंद केल्याचे दिसते. मालमत्ता पत्रकामध्ये २८.११.१९५८ पासुन संस्थेच्या मिळकती या 'श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे या नावाने दाखविण्यात आल्या आहेत. चेंज रिपोर्ट क्र. १८१४/१९९२ मध्येही ट्रस्टचे नाव ''श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे असाच आहे. मात्र त्यावेळी धर्मदाय आयुक्तांकडे जी घटना व नियम प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये कोणीतरी हाताने नावामध्ये बदल व खाडाखोड करून ते 'श्री समस्त सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय कम्युनिटी मठ' केलेला आहे. मात्र छापील मजकुर मध्ये नाव बरोबर छापलेले आहे. या दोन नावातील विसंगतीमुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. तरी धर्मदाय उपआयुक्त साहेबांकडे आपल्या रजि. नंबर अे/१६ पुणे मध्ये विश्वस्तांचे नाव ''श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे'' असे दुरुस्त करण्यात यावे असा ठराव पाठविण्यात यावा.

**विषय क्र. २ :-** दि. ९.१२.२०१३ रोजी विशेष सर्वसाधारण सभेअगोदर सर्व समाज बांधवांच्या घरी सुधारीत घटना व नियम प्रत देण्यात आली होती. समाजाची दि. ९ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सुधारीत घटना व नियम मंजूर करण्यात आले होते. त्याची प्रत मा. धर्मदाय उपआयुक्त साहेबांकडे श्री. मनोज आरसिद्ध यांच्या कार्यकारिणीकडुन दाखल करण्यासाठी त्यांची निवड २६ मे २०१४

रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात आली होती. सदर प्रत दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, वेळोवेळी झालेले ठराव प्रत हे श्री. अनिल नारायण वाळवेकर व श्री. संजय गुरुनाथसा भांडगे या मावळते कार्यकारिणीला वेळावेळी मागणी करूनसुद्धा त्यांनी त्या दिल्या नाहीत. त्यामुळे श्री. मनोज आरसिद्ध यांच्या कार्यकारिणीस सदर प्रकरण मा. धर्मदाय उपआयुक्त साहेबांकडे दाखल करता आले नाही म्हणून आज पुन्हा नव्याने हा ठराव पास करण्यासाठी ठेवला आहे. ज्यायोगे सदर प्रकरण दाखल करता येईल. समाज बांधवाना सदर 'सुधारित घटना व नियम' प्रत पाहण्यासाठी समाजाच्या ऑफिसमध्ये ठेवण्यात आली आहे. त्याची प्रत कोणास पाहिजे असल्यास त्यांनी लेखी अर्ज देऊन मागणी केल्यास मिळू शकेल.

**विषय क्र. ३ :-** आपल्या समाजाचे धर्मदाय उपआयुक्त कार्यालयामध्ये १९९५ सालापासुन वेगवेगळे चेंज रिपोर्ट, योजना, किरकोळ अर्ज वगैरे प्रलंबित आहेत. त्यामुळे आपल्या समाजाच्या मिळकत पत्रिकेवर कार्यकारिणीच्या नावांची अद्यावत नोंद करण्यात आली नाही. त्यामुळे सुप्रिम कोर्टातुन आपल्या समाजाच्या बाजूने निकाल लागुनसुद्धा कादीरभाई गॅरेज व हेमाडे यांच्या वर्कशॉपच्या जागेचा ताबा केवळ पुणे म.न.पा. कडून नकाशा मंजूर करता येत नसल्यामुळे मिळालेला नाही. त्यामुळे आपल्या समाजाचे दररोज सुमारे १ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. आपला समाज खूपच गरीब आहे व हे होणारे नुकसान मागील बरेच वर्षांपासून होत आले आहे. वैयक्तिक हेवेदावे, मानपानामुळे ते लवकर मिटविले गेले नाहीत. तरी संबंधीत दाव्यातील श्री. गजानन शालगर, श्री. संदीप चव्हाण, श्री. अनिल वाळवेकर, श्री. संजय भांडगे, श्री. अनिल पवार, श्री. सुनिल झाड व श्री. अनिल कुक्कर व इतर जे जे संबंधीत असतील त्या सर्वांना आजच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये निमंत्रित करतो व त्यांना समाजातर्फे विनंती करतो की त्यांनी सर्व वेगवेगळ्या प्रलंबित कोर्ट कामामध्ये पुढील आशयाचे पत्र वरील सर्व दावे निकाली निघण्यासाठी दाखल करावे.

**''समाज बांधवांनी केलेल्या विनंतीवरून समाजाच्या हितासाठी यापुढे मला दाव्यामध्ये नवीन कोणताही पुरावा वा अर्ज दाखल करावयाचा नसुन, नवीन कोणताही युक्तिवाद करावयाचा नाही. तरी सदर दावा दाखल असलेल्या कागदपत्रावरून मे. कोर्टाने लवकरात लवकर निकाली काढावा ही नम्र विनंती आहे.''**

**विषय क्र. ४ :** आपल्या समाजातील एक समाज बांधव श्री. अनिल विष्णूसा पवार यांनी २६ मे २००५ रोजी मा. धर्मादाय उपआयुक्त पुणे यांचेकडे अर्ज क्र. ३२/०५ दाखल केले. त्यावेळी त्यांनी १९९२ साली जे ट्रस्टी होते त्यांच्या नावाने नोटीसा पाठविल्या. सदर अर्जामध्ये त्यांनी लिहिले आहे की ''सदर ट्रस्टचे दैनंदिन कामकाजाकरीता तसेच सुरुळीत कारभार चालणेसाठी नियम, नियमावली, घटना अगर योजना नसलेने ट्रस्टचे व्यवस्थापन चांगल्याप्रकारे पार पाडता येत नाही. त्यासाठी ट्रस्टच्या सर्व सभासदांची सभा होऊन त्यांनी ट्रस्टची योजना (स्किम) करणेत यावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले व तसा अर्ज करणेबाबत, अर्जदारांना अधिकार दिलेत त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.'' अर्जदारांची नावे पुढील प्रमाणे १) श्री. अनिल विष्णूसा पवार (स्वतः), २) श्री. श्रीकांत कृष्णातसा पवार (चुलतभाऊ) ३) श्री. जगदीश रामचंद्रसा मिस्किन (मेव्हणा), ४) श्री. रामभाऊ मोतीरामसा पांढरे (मेव्हणा), ५) सौ. पद्ममा अशोक पवार (सख्खी काकी) ६) सौ. लतिका रामभाऊ पांढरे (चुलत बहिण), ७) सौ. राजश्री जगदीश मिस्किन (चुलत बहिण) सर्व त्यांचे एकट्यांचे नातेवाईक आहेत. वरील सर्वांनी परिपत्रक क्र. १४८ लिहिताना कलम ८मध्ये सध्याचे ट्रस्टचे सभासदांचा तो कोणी नातेवाईक आहे का ? अथवा नियोजीत सभासदांचा नातेवाईक आहे का ? मध्ये ते कोणी एकमेकांचे नातेवाईक ''नाही'' असे प्रतिज्ञापूर्वक खोटी प्रतिज्ञापत्र लिहून दिले आहे. सदर अर्जामध्ये कलम ४ मध्ये विश्‍वस्थ व्यवस्थेची स्थावर, जंगम माल मिळकतीची अंदाजे किंमत शुन्य रुपये लिहिली आहे व कलम ५ मध्ये सार्वजनिक विश्‍वस्थ व्यवस्थेची वार्षिक आवक शुन्य रुपये लिहिले आहे. कलम ८ मध्ये अर्जदारांचे न्यासमधील हितसंबंध मध्ये 'सदर अर्जदार हे ट्रस्टचे विश्‍वस्थ आहेत' असे लिहिले आहे. तसेच सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी दिनांक ८.९.१९९३ रोजी बदल अर्ज क्र. १८१४/९२ प्रमाणे ट्रस्टने स्किम करावी अशी सूचना देऊनही जाब देणारे यांनी कुठलीही स्किम सदर कोर्टात सादर केली नाही असे लिहिले आहे व कलम ९ मध्ये ''विद्यमान विश्‍वस्थांनी जी घटना तयार केली आहे त्याची टंकलिखित प्रत सोबत जोडली आहे.''

अर्जासोबत त्यांनी जी घटना (योजना) दाखल केली आहे त्यामध्ये कलम २ मध्ये ट्रस्टचे कार्यलयाच्या पत्त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार हा विश्‍वस्थांनी राहिल'' असे लिहिले आहे. कलम ४ मध्ये न्यासाच्या मालमत्तेवर अधिकार असलेले विश्‍वस्थ मंडळ म्हणून वरील ७ जणांची नावे दिली आहेत.

कलम ७ च्या ३ मध्ये सभासदत्व मिळण्यासाठी आगाऊ सभासद नोंदणी करता

प्रवेश शुल्क एक रुपया व वार्षिक वर्गणी **<u>दोन आणे</u>** रोख कार्यवाहाकडे धाडली पाहिजे. सर्व शुल्क रोख व आगाऊ अर्जासोबतच आल्याशिवाय अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. कलम ७च्या ४ मध्ये कार्यकारिणी मताधिक्याने अनुमति देतील त्यासच सभासद म्हणून स्विकृत करण्यात येईल. कलम ७ च्या ६ मध्ये ''ज्या सभासदाकडे २ वर्षाहून अधिक वर्गणी थकली असेल त्याचे सभासदत्व रद्द समजण्यात येईल.''

अनिल पवार व त्यांच्या इतर विश्वस्थांना आम्ही जाहीर पुढील प्रश्न विचारीत आहोत. त्याचा त्यांनी लेखी खुलासा समाजाच्या ऑफिसमध्ये सदर विशेष सर्वसाधारण सभेपूर्वी ५ दिवस अगोदर आणून घ्यावा.

प्रश्न १) सदर अर्ज दाखल करण्याअगोदर ट्रस्टच्या सर्व सभासदांची सभा कोणत्या तारखेस झाली होती ?

२) सदर सभेची जाहीर नोटीस कोणत्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती ? त्याची प्रत देणे,

३) सदर सभेमध्ये कोणकोण सभासद उपस्थित होते ? त्यांची नावे व सही असलेली नोंद वही झेरॉक्स प्रत.

४) सभेचे ठिकाण व वेळ

५) विश्वस्थ म्हणून एकाच कुटुंबातील ७ व्यक्तिंची नावे सुचविणारे व त्यास अनुमोदक देणा-यांची नावे,

६) जर भारत सरकारने १६ आणे १ रुपया हे चलन १९६० रोजी बंद करून दशमान पद्धतीप्रमाणे १०० पैसे १ रुपया हे चलन बाजारात आणल्यानंतर तुमच्या योजनेमध्ये सभासद नोंदणी फी वार्षिक दोन आणे फी देण्याचे नमुद केले आहे व ती न दिल्यास व थकविल्यास सभासदत्व रद्द समजण्यात येईल असे नमुद केले आहे. जर बाजारात २ आणे हे चलनच २००५ साली उपलब्ध नसेल तर ते कोण कसे देऊ शकेल? तुम्ही ७ जणांनी तरी ती फी जमा केली आहे का ?

७) समाजाच्या देवस्थानांचा व कार्यालयाचा ताबा कोणाकडे आहे ?

८) स्थावर जंगम माल मिळकतीची किंमत शून्य रुपये व वार्षिक आवक शुन्य रुपये आहे तर देवस्थातील आलेले सर्व उत्पन्न तुम्ही ७ जणांनी खाल्ले का?

९) कलम ७च्या ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे नवीन सभासद स्विकृत करण्याचा अधिकार फक्त तुम्हां ७ जणानाच कोणी दिला ? हा मनमानी कारभार तुम्ही किती वर्ष केला ?

१०) तुमच्या सभासदांच्या नावांची यादी लेखी ताबडतोब देणे,

११) तुमच्या २००५ सालापासून आजपर्यंतचा ऑडीटेड बॅलन्स शिटस दाखल करावे, १२) धर्मदाय आयुक्तांकडे तुम्ही आजपर्यंत हिशोब दाखल केला का? त्याच्या प्रती देणे १३) तुमच्या योजनेतील कलम १० मधील १ मध्ये छापले आहे की ट्रस्टची वार्षिक सर्वसाधारण सभा न्यासाचे वर्ष संपलेपासून चार महिन्यात घेतली पाहिजे.'' त्याप्रमाणे २००५ पासून २०१४ पर्यंत तुमच्या दरवर्षी सर्वसाधारण सभा झाल्या का? त्या सर्व सभांची सविस्तर माहिती लेखी देणे. त्यामध्ये सभा कोणत्या तारखेस झाल्या, कोठे झाल्या ? कोणकोण सभासद उपस्थित होते ? सभेचे विषय कोणते ? २००५ सालापासुन २०१४ पर्यंत विश्वस्थांच्या नावामध्ये काही बदल झाला का नाही ? असल्यास त्यांची नावे. इत्यादी इत्यादी.

तुम्ही दाखल केलेली योजना ३२/०५ ही धर्मदाय आयुक्तांनी दि. १२.१२.२००५ रोजी मंजुरी केली. त्या आदेशाविरूद्ध श्री. गजानन शालगर व त्यांच्या कार्यकारिणीने दि. १२.१.२००६ रोजी सिव्हील किरकोळ अर्ज क्र. ३७/२००६ हा ॲडीशनल डिस्ट्रिक्ट कोर्टामध्ये दाखल केला. त्या दाव्यामध्ये त्यांनी मे. कोर्टाच्या निदर्शनास आणले की तुम्ही २००५ साली अर्ज दाखल करताना प्रतिवादी म्हणुन १९९२ सालातील कार्यकारिणीला नोटीसा काढल्या. २००५ साली असलेल्या कार्यकारिणीला नोटीसा काढल्या नाही. तसेच सदर दाव्यामध्ये कोणी उपस्थित नसताना एकतर्फी निकाल मिळविला. ५२०/२००५ चेंज रिपोर्ट प्रलंबित असल्याचे लपवून ठेवले. तसेच समाज बांधव श्री. अनिल कुक्कर यांनी २४.११.२००५ रोजी सदर अर्ज क्र. ३२/०५ ला हरकत नोंदविलेली असतानासुद्धा यांनाही नोटीस न पाठविता ऑर्डर मिळविली. तुम्ही ७ जणांनी स्वतःला विश्वस्थ म्हटले आहे. मात्र कागदोपत्री कोणताही पुरावा दाखल केलेला नाही इत्यादी इत्यादी. मे. कोर्टाने दि. २९.७.२००६ रोजी सदर दावा क्र. ३७/२००६ मान्य केला व तुमचा अर्ज क्र. ३२/०५ जो दि. १२.१२.२००५ रोजी मंजुर झाला होता तो रद्दबातल केला व बाजूला ठेवण्यात आला (**Order under challenge is quashed and set aside**) व सदर प्रकरणाची पुन्हा नव्याने सुनावणी घेण्याचा आदेश दिला.

सदर निकाल २९.७.२००६ रोजी देण्यात येऊन पुन्हा २००२ ते २००७ सालासाठी निवडुन आलेल्या कार्यकारीनीने त्यांचा कारभार पुढे चालू ठेवला.

तुमचा अर्ज क्र. ३२/०५ हा २९.७.२००६ रोजी रद्दबातल झाल्यानंतर त्याची पुन्हा नव्याने सुनावणी घेण्याचा आदेश कोर्टाने दिल्यानंतर त्याची नव्याने सुनावणी पूर्ण

य

होण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न केले? आता २०१५ साली त्याची काय परिस्थिती आहे ? त्याचा लेखी खुलासा करावा.

तुमचा ३२/०५ अर्ज दि. १२.१२.२००५ रोजी मंजुर झाल्यानंतर तुम्ही ७ जणांनी अखिल भारतीय वधु-वर परिचय मेळावा वा सामुदायिक मौजीबंधनाचा कार्यक्रमामध्ये अडथळा आणून सदर कार्यक्रम उद्वस्त करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यावेळी तुम्ही ७ जणांनी संपूर्ण समाजास वेठीस धरले होते हे कोणीही समाज बांधव विसरू शकणार नाही.

समाजाच्या वेगवेगळ्या आतापर्यंत झालेल्या सर्व साधारण सभेस श्री. अनिल विष्णूसा पवार हे उपस्थित रहात होते. मात्र सभेच्या उपस्थित वहीमध्ये स्वतःचे नाव कधीही लिहिले नाही व सही केली नाही. मात्र त्या त्या सभेचे व्हिडीओ शुटींग मध्ये चर्चेमध्ये सहभाग घेताना ते दिसतात. समाजाची ९ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेस ते सही न करता उपस्थित असल्याचे व्हिडिओ शुटींगमध्ये दिसतात. तसेच चर्चेमध्ये सहभाग घेताना समाजाची आता तयार केलेली घटना मंजुर होणे आवश्यक असल्याचे व ती मंजुर करून घेण्यासाठी योग्य सहकार्य करण्याचे जाहीर आश्वासन देतात. वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी समाजास जो नाहक त्रास दिला होता त्याबद्दल त्यांच्याबद्दल समाजाच्या मनामध्ये नाराजी होती. घटना मंजुर करण्यासाठी वादातील मंडळी एकत्र आली तर ती लवकर मंजूर होऊ शकेल या विचाराने लोकांची नाराजी असतानासुद्धा श्री. अनिल विष्णूसा पवार यांना नवीन कार्यकारिणीमध्ये निवड करण्यात आली. त्यांच्या हट्टापाई त्यांची सेक्रेटरी पदावर नेमणुक करण्यात आली व त्याप्रमाणे कामकाज सुरु करण्यात आले. बँक ऑफ महाराष्ट्र व सहस्त्रार्जुन पतपेढीमध्ये समाजाचे खाते काढण्यासाठी ठराव मंजूर करण्यात आला व खाते सुरु करण्यासाठी बँकेच्या फॉर्मवर फोटोसह सह्या करण्यात आल्या. पुढे काही वैयक्तिक हवेदावेमुळे अनिल पवार यांनी कार्यकारिणीच्या सभेस न उपस्थित रहाण्याचे धोरण ठेवले मात्र स्वतःच्या पदाचा राजीनामा दिला नाही. पुढे ते सतत गैरहजर राहिल्याने घटनेप्रमाणे त्यांना पदावरून दूर करण्यात आले.

९ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या ठरावाप्रमाणे समाजातील सर्व कोर्ट प्रकरणे सामोपचाराने मिटविण्यात यावेत असा ठराव सर्वानुमते मंजूर झाला आहे. त्या ठरावाप्रमाणे आम्ही समन्वय समिती सदस्य श्री. अनिल पवार व त्यांच्या वरील ६ कुटुंब सदस्यांना जाहीर आवाहन करीत आहोत की त्यांनी समाजाच्या मुळ प्रवाहामध्ये सामील व्हावे व वरील खोटी माहिती देऊन व खोटे प्रतिज्ञापत्र

देऊन जो अर्ज क्र. ३२/०५ मे. धर्मदाय आयुक्तांकडे दाखल केला आहे तो वास्तविक २९.७.२००६ रोजी रद्दबातल केलेला आहे व पुन्हा नव्याने सुनावणी घेण्यासाठी परत पाठविला आहे. तो माघारी घ्यावा व आता ९ डिसेंबर २०१३ रोजी जी घटना व नियम मंजूर केले आहे त्यास मान्यता देऊन तो लवकर मंजूर होण्यासाठी सहकार्य करावे. वरील सात जणांना या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहुन त्यांना त्यांची बाजू समाजापुढे मांडण्यासाठी जाहीर निमंत्रित करीत आहोत. सदर सभेमध्ये त्यावर चर्चा करून सर्व सभासदांनी पुढील कारवाईबाबत योग्य निर्णय घ्यावयाचा आहे.

**विषय क्र. ५ :** वर विषय क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रलंबित दावे लवकरात लवकर निकाली काढण्यात यावे म्हणुन समाजातर्फेही मे. कोर्टामध्ये अर्ज दाखल करण्यात यावा.

**विषय क्र. ६ :-** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.

**विषय क्र. ७ :-** १.४.२००८ ते ३१.८.२००८ मुदतीचा हिशोब दाखल करण्यासाठी श्री. गजानन शालगर यांच्या कार्यकारिणीस विश्वेश्वर सहकारी बँकेचे स्टेटमेंट पाहिजे होते. सदर बँकेने समाजाच्या कोर्ट कारवाईमुळे आपल्या समाजाचे बँक खाते व्यवहार बंद केला होता व त्यामुळे त्यांच्याकडुन खात्याचे स्टेटमेंट मिळत नव्हते. समाज बांधव पटवेकर व मनोज आरसिद्ध व इतर हे विश्वेश्वर बँकेच्या चेअरमन साहेबांशी भेटून त्यांना सत्य परिस्थिती सांगितल्यानंतर त्यांनी स्टेटमेंट दि. १३.११.२०१४ रोजी संस्थेस दिले. त्याची झेरॉक्स प्रत श्री. संदीप चव्हाण यांना दिल्यानंतर त्यांनी त्यांचा हिशोब दि. ७.१२.२०१४ रोजी दिला.

**विषय क्र. ८ :** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.

**विषय क्र. ९ :** श्री. अनिल नारायणसा वाळवेकर व श्री. संजय गुरुनाथसा भांडगे यांच्या कार्यकारिणीने २६ मे २०१४ रोजी १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०१३ या तीन वर्षाचा जमा खर्च हिशेब दाखल केला होता. सदर हिशोब पहाता त्यामध्ये ब-याच त्रुटी दिसुन आल्या. उदा. बँकेतील डिपॉझिट व डिपॉझिट मोडून काढलेली रक्कम हिशोबामध्ये दिसून येत नसल्याची तक्रार सदर सभेमध्ये सभासदांनी दाखवुन दिल्यानंतर सदर सभेमध्ये श्री. अनिल वाळवेकर अध्यक्ष गैरहजर होते. श्री. संजय भांडगे यांनी वरील हिशोब पुन्हा

२ महिन्यामध्ये अॅडीटेड करून दाखल करतो व आताचा हिशोब मागे घेतो असे जाहिर केले तो त्यांना वारंवार मागूनही अद्याप दिलेला नाही. सदर हिशोब दाखल करण्यासाठी त्यांना अंतीम मुदत देण्याबाबत चर्चा व निर्णय घेणे.

**विषय क्र. १० :** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.
**विषय क्र. ११ :** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.
**विषय क्र. १२ :** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.
**विषय क्र. १३ :** कॉम्प्युटराईज्ड पद्धतीने फोटोसह सर्व समाज बांधवांचे आजीवन सभासद नोंदणी करावयाची असल्यामुळे सर्व जुन्या व दि. ३१.५.२०१५ पर्यंत १८ वर्ष पूर्ण होणा-या सर्व स्त्री, पुरुष पुणे जिल्ह्यातील समाज बांधवांनी सदर नवीन फॉर्म फोटोसह भरून देणे आवश्यक आहे. सदर नोंदणी फी. रु. १०/- आयुष्यात फक्त एकदाच द्यावयाची आहे. अगोदर आपले कार्यक्षेत्र फक्त पुणे शहरापुरते मर्यादीत होते आता संपूर्ण पुणे जिल्हा करण्यात आलेले आहे. त्याचे काम खूपच मोठे असल्यामुळे जनगणना व आजीवन सभासद नोंदणी करण्यासाठी समाजातीलच स्वयंसेवकांची नेमणूक करावयाची आहे. त्यांना वरील फॉर्म समाज बांधवांकडून भरून घेऊन ते समाजाच्या ऑफिसमध्ये आणुन द्यावयाचे आहे. त्यासाठी त्यांना वरील कामासाठी प्रत्येक आजीवन सभासद नोंदणीसाठी ५ रुपये मानधन देण्यात येईल. तरी वरील सामाजिक कार्य करण्यासाठी जास्तीत जास्त स्वयंसेवकांनी पुढे यावे व जनगणना व आजीवन सभासद नोंदणी कार्य लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.

विशेष सर्वसाधारण सभेच्या अहवालासोबत जनगणना फॉम व आजीवन सभासद नोंदणी फॉम जोडले आहेत. तसेच जनगणनी फॉर्म व आजीवन सभासदत्व फॉर्म समाजाच्या स्वारगेट येथे व कार्यालयात कार्यालयीन वेळेत दिले व स्विकारले जातील. तसेच १ फेब्रुवारी २०१५ रोजी सभेच्या ठिकाणी सभेच्या वेळामध्ये दिले व स्विकारले जातील. समाजाच्या वेब साईटवर जनगणना फॉर्म व आजीवन सभासद नोंदणी फॉर्म मिळू शकतील.

**विषय क्र. १४ :** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.
**विषय क्र. १५ :** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.
**विषय क्र. १६ :** सदर विषय मांडण्यात आलेला आहे.

## AUDIT REPORT IN RESPECT OF YOUR ACCOUNTS FOR THE PERIOD 11.06.2014 TO 31.12.2014

I have audited the Income & Expenditure Account of **Somvanshiya Shree Sahatrarjun Kshatriya Samaj Trust** for the period from 11.06.2014 to 31.12.2014 on the basis of books of Accounts and other record produced before me and report that :-

1. The Accounts are in agreement with the books of accounts maintained by the Trust.

2. I have obtained all the information and explanations which to the best of my knowledge and belief where necessary for the purpose of audit.

3. In my opinion proper books of accounts have been kept by the Trust so far as it appears from my examination of books subject to the observations and suggestions annexed herewith (Part II).

4. In my opinion and to the best of my information and according to explanation given to me the said accounts give true and fair view

A. In case of Income & Expenditure Account, for the period from 11$^{th}$ June, 2014 to 31st December, 2014

**For M/S SSKS & ASSOCIATES.**

DATE : 09.01.2015

**CHARTERED ACCOUNTANT**

**CA SACHIN C. HABIB**

**(Proprietor)**

## AUDIT REPORT

***************************

To,
TRUSTEES,
**Shree Somvanshiya Shree Sahatrarjun Kshatriya Samaj Trust**
Kshatriya Bhawan,
576,Guruwar Peth ,
PUNE – 411042.

### PART-I

### 1. GENERAL REMARKS:

I have carried out the Audit of Accounts of **Shree Somvanshiya Shree Sahatrarjun Kshatriya Samaj Trust**, Pune, as per appointment of our firm M/s. SSKS & ASSOCIATES., CHARTERED ACCOUNTANT, as an Auditor for the period from 11.06.2014 to 31.12.2014 on the basis of record produced & information given to me.

The registration No. of the trust is A-16, Pune.

The Trust had maintained necessary Books of Accounts properly. The books of accounts written in proper accounting manner & the statements of Accounts i.e. Income & Expenditure Account is prepared according to general Accounting Rules.

Mr. Manoj Arsiddha has worked as Chairman for the period under audit.

Mr. Anil Damji has worked as Secretary for the period under audit.

### 2. FINANCIAL ANALYSIS:

**1) CURRENT ASSETS :**

Current Assets include mainly Cash & Bank Balances, which are as under at the end of 31st December 2014. The Cash Balance found correct as per cashbook. The Bank balances are duly reconciled. The details of cash & bank balances are as under:

- Cash In Hand:- Rs 8752.00
- Bank Balance:- Rs 357361.00

**3.INVESTMETNS :**

During the year trust made Fixed Deposits with various banks. Balance as on 31st December 2014 is Rs 21,45,709

| Sr. No. | PARTICULARS | AMOUNT Rs. |
|---|---|---|
| I. | F.D.with Bank of Maharashtra | 900000=00 |
| ii. | F.D.with Vishweshwar sah. Bank Ltd | 116232=00 |
| iii. | F.D.with Vishweshwar sah. Bank Ltd | 150000=00 |
| iv. | F.D.with Vishweshwar sah. Bank Ltd | 58117=00 |
| v. | F.D.with Vishweshwar sah. Bank Ltd | 100000=00 |
| vi. | F.D.with Vishweshwar sah. Bank Ltd | 100000=00 |
| vii. | F.D.with Vishweshwar sah. Bank Ltd | 116232=00 |
| viii. | F.D.with Vishweshwar sah. Bank Ltd | 116232=00 |
| ix. | F.D.with Canara Bank | 200000=00 |
| x. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 46160=00 |
| xi. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 17620=00 |
| xii. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 30712=00 |
| Xiii. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha. | 8094=00 |
| Xiv. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 10900=00 |
| Xv. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 59000=00 |
| Xvi. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 15000=00 |
| Xvii. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 16270=00 |
| Xviii. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 14000=00 |
| Xix. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 15000=00 |
| XX. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 14000=00 |
| Xxi. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 14000=00 |
| Xxii. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 16585=00 |
| Xxiii. | F.D.with Sahastrarjun Nagari Sah. Patsanstha | 11555=00 |
| | **Total** | 2145709=00 |

**4. RECEIPTS :**

Income & Expenditure A/C is credited by Donation, Interest, Rent, & Other Income. All Receipts are properly accounted.

Wherever receipts are not available *I* have relied upon the day-to-day record maintained & certified by the Trust.

**5. EXPENDITURES:**

All the Expenses are supported by the vouchers, which are charged to proper accounting heads. Wherever supporting documents are not available, *We* have relied on the office vouchers prepared & authorised by the officials of the Trust.

**6. INCOME & EXPENDITURE A/C:**

During the audit period the Income & Expenditure A/c of the Trust shows surplus of **Rs 2,05,169.00**/-.

PLACE: PUNE

DATE : 09.01.2015

**For M/S SSKS & ASSOCIATES.**

CHARTERED ACCOUNTANT

**CA SACHIN C. HABIB**

**(PARTNER)**

# SHREE SOMVANSHIYA SHREE SAHATRARJUN KSHATRIYA SAMAJ TRUST

**KSHATRIYA BHAWAN,576 GURUWAR PETH, PUNE – 411042.**

## AUDIT REPORTPART II

**OBESRVATIONS AND SUGGESTIONS:**

1) It is suggested that specific rules to be framed for the entire working / administration of the trust concern with eligibility, Retirement of the trustees, tenure of trustees, acceptance of resignations , policy regarding capital expenditure etc.

2) In some circumstances, it shows heavy cash balance with trust. It is necessary that the average cash balance up to Rs.500/- should be maintained & excess cash should be immediately deposited in bank.

3) It is also observed that Income Tax Return is not filed by Trust ( FY. 2008 to 2014 )

4) From FY 2008-2009,2009-2010,2010-2011,2011-2012,2012-2013,2013-2014 Trust is not able to prepare Trial balance.

5) Books of account is kept on cash basis by Trust.

6) Earlier years Audit reports is not available With Trust

7) Trust has made FD with Uco Bank of Rs 200000 & FD with Sahastrarjun Nagari Sahakari Patsanstha Of Rs 230712 but FD receipts is not with Trust & UCO Bank saving account passbook also not having with Trust.

PLACE: PUNE **For M/S SSKS & ASSOCIATES.**

DATE : 04.07.2014 CHARTERED ACCOUNTANT

CA SACHIN C.

HABIB.

(Proprietor)

श्री

## ११/०६/२०१४ ते ३१/१२/ २०१४ जमाखर्च लेखा या कालावधीचा
## श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट
## क्षत्रिय भवन ५७६ गुरूवार पेठ पुणे ४११०४२

| खर्च | रक्कम रू. | जमा | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| दैनंदीन खर्च (सुची क्र.-२) | 233,910.00 | भाडे जमा | 667,495.00 |
| उत्सव खर्च (सुची क्र.-३) | 335,559.00 | देणगी जमा | 109,088.00 |
| प्रोफेश्नल फी | 4,000.00 | व्याज जमा | 8,485.00 |
| घसारा (सुची क्र. ४) | 8,640.00 | लग्न हक्क पावती | 306.00 |
| खर्च वजा करता अधिक उत्पन्न | 205,169.00 | साखरपुडा हक्क | 204.00 |
| | | वस्तुस्वारुपातील देणगी | 1,300.00 |
| | | ईतर उत्पन्न | 400.00 |
| | **787,278.00** | | **787,278.00** |

अध्यक्ष -
श्री मनोज गुरुनाथसा आरसिध्द्

सचिव -
श्री अनिल नारायणसा दामजी

खजिनदार -
श्री राजेश चंद्रकांतसा कुक्कर

## ११/०६/२०१४ ते ३१/१२/ २०१४ जमाखर्च लेखा या कालावधीचा
## श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट
## क्षत्रिय भवन ५७६ गुरूवार पेठ पुणे ४११०४२

**सुची क्र. १ - भाडे जमा**

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| हॉल भाडे | - | 78,005.00 |
| जाहिरात फलक भाडे | - | 574,000.00 |
| पोस्ट ऑफीस भाडे | - | 15,490.00 |
| एकुण | - | **667,495.00** |

**सुची क्र. २ - दैनंदीन खर्च**

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| टेलीफोन खर्च | | 6,038.00 |
| पोस्टेज व टेलीग्राम | | 911.00 |
| वीजबील खर्च | | 50,866.00 |
| सफाई खर्च | | 2,781.00 |
| पुजा खर्च | | 16,981.00 |
| मिटींग खर्च | | 3,140.00 |
| प्रवास खर्च | | 625.00 |
| डागडुजी खर्च | | 1,590.00 |
| प्रिंटींग व स्टेशनरी | | 4,627.00 |
| ऑफीस खर्च | | 2,340.00 |
| पगार | | 126,750.00 |
| इतर खर्च | | 16,761.00 |
| जाहिरात खर्च | | 500.00 |
| एकुण | | 233,910.00 |

**सुची क्र. ३ - उत्सव खर्च**

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| गणपती उत्सव | - | 18,085.00 |
| नवरात्र उत्सव | - | 141,652.00 |
| सहस्त्रार्जुन जयंती | - | 175,822.00 |
| एकुण | - | 335,559.00 |

## ११/०६/२०१४ ते ३१/१२ /२०१४ जमाखर्च लेखा या कालावधीचा
## श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट
## क्षत्रिय भवन ५७६ गुरूवार पेठ पुणे ४११०४२

**सुची क्र. ४ घसारा फक्त (९ महिन्यांसाठी)**

| अ.क्र | तपशील | WDV. ०१.०१.२०१४ | नविन गुंतवणूक | एकुण | घसारा दर | घसारा | WDV. ३१.१२.२०१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **संगणक** | 832.00 | - | 832.00 | 60% | 374.00 | 458.00 |
| २ | **दक्षिणा पेटी** | 9,859.00 | - | 9,859.00 | 10% | 740.00 | 9,119.00 |
| ३ | **नविन मारूती मंदीर** | 101,185.00 | - | 101,185.00 | 5% | 3,794.00 | 97,391.00 |
| ४ | **सतरंजी** | 16,673.00 | - | 16,673.00 | 15% | 1,876.00 | 14,797.00 |
| ५ | **मशीन्स** | 4,570.00 | - | 4,570.00 | 15% | 514.00 | 4,056.00 |
| ६ | **सी.सी.टीव्ही कॅमेरा** | - | 35,780.00 | 35,780.00 | 15% | 1,342.00 | 34,438.00 |
| | | **133,119.00** | **35,780.00** | **168,899.00** | | **8,640.00** | **160,259.00** |

# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

कार्यालय : 'क्षत्रिय भवन', ५७६, गुरुवार पेठ, पुणे-४११०४२. फोन. : ०२० -२४४७२३४०,२४४३५६९५
उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे-४११०४२.
(कार्यालयीन वेळ : सकाळी १० ते १, सायं. ४ ते ७)

**आपल्या समाजाची जनगनना करण्यात येत असुन आजीवन सभासद नोंदणी करण्यात येत आहे.**
**सभासद फॉर्म वाटप करण्यात येत आहे.**

**फॉर्म मिळण्याचे ठिकाण :**
**कार्यालय : 'क्षत्रिय भवन', ५७६, गुरुवार पेठ, पुणे-४११०४२.**
**फोन. : ०२० -२४४७२३४०,२४४३५६९५**
**उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे-४११०४२.**
**(कार्यालयीन वेळ : सकाळी १० ते १, सायं. ४ ते ७)**

**अध्यक्ष -**
**श्री मनोज गुरुनाथसा आरसिध्द्**

**सचिव -**
**श्री अनिल नारायणसा दामजी**

**खजिनदार -**
**श्री राजेश चंद्रकांतसा कुक्कर**

पोस्ट - बुक

प्रति,
श्री / सौ. ______________________

______________________

______________________

**श्री सोमवंशीय सहस्त्रार्जन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे**

कार्यालय : 'क्षत्रिय भवन', ५७६, गुरुवार पेठ, पुणे-४११०४२.
फोन. : ०२० -२४४७२३४०,२४४३५६९५
उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे-४११०४२.
(कार्यालयीन वेळ : सकाळी १० ते १, सायं. ४ ते ७)